स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत लोकप्रशासन
विषयातील पीएच.डी. पदवी साठी सादर करावयाच्या
नियोजित शोधप्रबंधाचा आराखडा

~: संशोधनाचा विषय :~

"राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासनाचे प्रारुप : एक तुलनात्मक अभ्यास"

~: संशोधक :~

कसबे शिवशंकर दगडू

~: मार्गदर्शक :~

डॉ. टी. एन. मगर
विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग
श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर

२०१६

"राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासनाचे प्रारुप : एक तुलनात्मक अभ्यास"

प्रस्तावना :-

सामाजिक प्रशासन सामुदायिक सेवा करीत असते. भारतात हजारो वर्षापासून समाजसेवा केली जाते. सामाजिक प्रशासनाचा संबंध सामाजिक सुधारणेशी आहे. सामाजिक सुधारणा म्हणजे समाजात चळवळी, जनमताचा रेटा निर्माण करुन अथवा कायद्याद्वारा क्रांतीकारक बदल करणे व जुन्या रूढी, परंपरा नष्ट करणे नवीन मानवी मूल्यावर आधारीत समाजाची उभारणी करणे होय. भारतात आणि महाराष्ट्रात समाजसुधारकांची एक दीर्घ परंपराच आहे. राजाराम मोहनराय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, साने गुरुजी, संत गाडगे महाराज या सर्व महापुरुषांनी समाजातील दुष्ट, वाईट रुढी, परंपरा विरुद्ध लढा दिला व समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न केला. या समाजसुधारकांच्या अथक प्रयत्नामुळे स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर सरकारला अनेक कायदे संमत करावे लागले. उदा. सतीप्रथा बंदी कायदा, विवाहासंबंधीचे कायदे, बालविवाह प्रतिबंधक कायदा, अस्पृश्यता निर्मुलन कायदा, हिंदू उत्तराधिकारी कायदा, हिंदू अज्ञान संरक्षण कायदा, हिंदू दत्तक ग्रहण व भरणपोषण कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, इ. तसेच कामगारांसाठी कामगार नुकसान भरपाई कायदा, मातृत्वविषयक कायदा, कामगार भविष्यनिर्वाह निधी कायदा, कामाची कपात व कामाची कमतरता कायदा या सर्व कायद्यांची अंमलबजावणी सामाजिक प्रशासनाकडून केली जाते.

सामाजिक कल्याण प्रशासन हे इतर अनेक नावांनी ओळखले जाते. उदा. सामाजिक सेवा प्रशासन, सामाजिक प्रशासन, लोककल्याण प्रशासन, जनसमाजिक प्रशासन, सामाजिक कार्य प्रशासन या नावाने ओळखले जाते. समाजकल्याण ही संकल्पना भारतात प्राचीन काळापासून प्रचलीत राहिली आहे. मौर्य शासन काळात सम्राट अशोकांच्या ऐतिहासिक दस्ताऐवजामध्ये त्यांचे समाजकल्याण विषयक धोरण स्पष्ट होते कौटिल्यांनी देखील राज्य स्वयंनिर्धन, गर्भवती स्त्रीया, अनाथ, वृद्ध, निराधार, पिडीत लोकांना मदत करणे तसेच घटस्फोट झालेल्या महिलांच्या सन्मानाची रक्षा करणे तसेच पैशांची व्यवस्था करणे, व्यसनाधीन लोकांसाठी नियम तयार करणे. भ्रष्टाचार केल्यास संबंधीत कर्मचारी प्रजेला शिक्षेची तरतूद त्यांनी केली होती. अशा प्रकारे समाजकल्याणविषयक कार्याची पूर्तता वरील कालखंडामध्ये झाल्याचे दिसून येईल. त्यानंतरच्या काळात राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांचा कालखंड

आदर्श प्रशासनाचे उदाहरण म्हणून सांगता येईल.

1874 ते 6 मे 1922 हा राजर्षी शाहू महाराजांचा कालखंड आहे. 2 एप्रिल 1894 रोजी झालेल्या राज्याभिषेकापासून ते 6 मे 1922 या अखेरच्या क्षणापर्यंत म्हणजे 28 वर्ष राजर्षी शाहू महाराज कोल्हापूर संस्थानचे राजे म्हणून राज्यकारभार करत होते. राजर्षी शाहू महाराजांनी इतर संस्थानिकापेक्षा स्वकर्तृत्वाने स्वताचा ठसा उमटविला. राजर्षी शाहू महाराज हे अष्टपैलू महान व्यक्ती होते. हिंदी - शास्त्रीय संगीताचा एक उत्साही पुरस्कर्ता मल्लविद्येचा एक मोठा आधारस्तंभ, आदर्श प्रशासक, आधुनिक महाराष्ट्राचा एक निष्ठावंत भाग्यविधाता अशा महत्त्वाच्या भूमिका त्यांनी यशस्वीपणे वठविल्या. राजर्षी शाहू महाराजांनी स्वतःच्या निवास व राज्यास धोका पत्करून क्रांतीकारक सुधारणा घडवून आणल्या प्रजेच्या हितासाठी अजस्त्र धरणे उभारली, कालव्यांची भव्य योजना हाती घेतली अनेक सहकारी संस्था काढल्या.

भारतात पूर्वीपासून शिक्षण ही ब्राम्हणांची मक्तेदारी होती ब्राम्हणेत्तर बहुजन समाजातील जनतेला शिक्षणाचा अधिकार नव्हता बहुजनांना शिक्षणाची कसलीच सोय नव्हती त्यामुळे बहुजनांचा विकास खुंटला होता. राजर्षी शाहू महाराजांनी 1916 साली प्रत्यक्ष मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा राज्यात लागू केला. या कायद्यानुसार वय वर्षे 6 ते 14 या वयोगटातील सर्व जातीधर्माच्या मुली आणि मुले यांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानामध्ये शैक्षणिक परिस्थिती खालीलप्रमाणे निर्माण केली.

तक्ता क्र. 01

अ.क्र.	**तपशील**	**सन 1894**	**सन 1922**
1.	एकूण शिक्षण संस्था	224	259
2.	एकूण विद्यार्थी संख्या (राजाराम कॉलेज सोडून)	10844	27830
3.	ब्राम्हणेत्तर विद्यार्थी संख्या	8088	21027
4.	अस्पृश्य विद्यार्थी संख्या	234	2162
5.	ब्राम्हण विद्यार्थी संख्या	2522	2722
6.	राजाराम कॉलेज (एकूण विद्यार्थी संख्या)	79	265
7.	राजाराम कॉलेज (मागासवर्गीय विद्यार्थी)	06	100
8.	मुलींच्या शाळा	14	33
9.	विविध वसतीगृहातील विद्यार्थी	118	321

संदर्भ - National Conference relevance of Rajarshri Shahu Maharaj Thoughts in 21st century :chief editor, Dr. Mulgir M.T., Editor Dr. Waghmare S.P. 27th & 28th December 2013 Published, Rajveer Publication, Parbhani.)

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, शाहू महाराज राजे झाल्यावर जी संस्थानातील परिस्थिती होती त्यामध्ये बदल आपल्या कार्य कौशल्याने विविध कायदे करून त्यांचा अंमल बारकाईने करुन संस्थानात अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या 234 वरून 2162 एवढी झाली होती.

राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक विकासाला चालना देण्याबरोबरच राजकीय लोकशाही पेक्षा सामाजिक लोकशाहीस अधिक महत्त्व दिले होते. एक प्रशासक म्हणून त्यांनी समतेच्या तत्त्वांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली आहे. सामाजिक न्यायाची संकल्पना त्यांनी प्रभावीपणे राबविली. राजर्षी शाहू महाराजांची कोल्हापुरात राजवट सुरु होण्यापूर्वीचा आढावा घेणे आवश्यक आहे. मध्ययुगीन कालखंडातील प्रशासन हे राजेशाही स्वरूपाचे होते. जनकल्याणास त्या ठिकाणी दुय्यम स्थान दिले जात होते. जनतेचे शोषण हे राज्यकर्त्याकडून होत होते विषमता देखील मोठ्या प्रमाणात होती त्यानंतर सरंजामशाही प्रशासन आले. याकाळातही जनतेच्या सुखांचा गरजांचा विचार करण्यात आला नाही. जनतेचे सामाजिक, आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणात होत होते. त्यानंतर ब्रिटीश प्रशासन आले ते साम्राज्यवादाचा एक भाग होता त्यांनी आपला कारभार व्यवस्थित चालावा यासाठी इंग्रजी शाळा सुरु केल्या. कारकुनी पद्धतीला प्रोत्साहन दिले. वरील सर्व प्रशासनाद्वारे स्वातंत्र्य, सामाजिक समता न्याय प्रस्थापित होऊ शकला नाही. यासर्व प्रशासनामध्ये राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाडांच्या प्रशासन व्यवस्थेमध्ये फार तफावत दिसून येते राजर्षी शाहू महाराजांनी 2 एप्रिल 1894 रोजी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभारांची सूत्रे आपल्या हाती घेतली. सस्थांनातील सर्व वरिष्ठ अधिकारी पदावर युरोपीय किंवा संस्थानाबाहेरील लोक होते बहुजन समाजातील एकही व्यक्ती उच्च अधिकारपदी नव्हती या स्थितीत कोणता निर्णय घ्यावा याविषयी विचार केला व महाराजांनी मुत्सद्देगिरी व दूरदर्शी दृष्टीकोनातून बहुजन समाजाचा विकास घडवून आणायचा हे धोरण स्विकारले. त्यासाठी शिक्षणाच्या प्रसारावर त्यांनी भर दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजर्षी शाहु महाराजांचा गौरव करताना "The piller of Social Democracy"अशी बिरुदावली उपयोजित केली होती. राजर्षी शाहु महाराजांनी गंगाराम कांबळे नावाच्या अस्पृश्य व्यक्तीला चहाचे हॉटेल भरवस्तीत काढून दिले ते त्या ठिकाणी चहा पीत व इतर मराठा, ब्राम्हण जातीतील लोकांना चहा पाजवत. त्यांनी अस्पृश्यता निवारणासंबंधी जाहिरनामे काढली आहेत. तसेच महसूल, न्याय खात्यासंबंधी आरोग्य, शिक्षण खात्यातील जाहिरनामे महत्त्वाची आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत केली. त्यांना लंडनला शिक्षणासाठी पाठविले.

सयाजीराव गायकवाड हे ब्रिटीशांकित (1863 - 1939) बडोदा संस्थानचे राजे होते. उदारमतवादी,

लोकशाहीचे पुरस्कर्ते, पुरोगामी सुधारक एक आदर्श प्रशासक म्हणून त्यांची ख्याती होती. भारताच्या नवसमाजनिर्मितीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सयाजीराव गायकवाड सत्तेत येण्यापूर्वी अज्ञान पालकांची राजवट होती सयाजीराव गायकवाड यांनी राजर्षी शाहू महाराजां प्रमाणेच शिक्षणाला मोठ्या प्रमाणावर चालना दिली. आपल्या संस्थानचा विकास व्हावा यासाठी त्यांनी अनेक परदेश दौरे केले तेथील काही चांगले प्रयोग आपल्या राज्यात केले. 95% गुजराती भाषिकांचा राजा होण्याचे भाग्य त्यांना लाभले. सयाजीराव गायकवाड यांनी योजनाबद्ध कार्यक्रम हाती घेऊन प्रत्येक खेड्यात, शहरात सुधारलेल्या कारभारासाठी शाळा सुरु केल्या. ग्रंथालय, पाणीपुरवठा योजना, रुग्णालय आणि ग्रामपंचायत या 5 बाबींना आवश्यक मानले. याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

तक्ता क्र. 02

अ.क्र.	**तपशील**	**सन 1881**	**सन 1939**
1.	इंग्रजी शाळा	13	128
2.	मातृभाषेच्या शाळा	204	2414
3.	ग्रंथालय	01	1504
4.	सहकारी पतपेढ्या	संपूर्ण अभाव	1125
5.	ग्रामपंचायती	संपूर्ण अभाव	2104
6.	नगरपालिका	कसब्यात 26	41
7.	लोहमार्ग मैल	60	723

संदर्भ - सयाजीराव गायकवाड:- व्ही.के.चावडा, (मराठी अनुवाद), स.गं. मालशे, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली 1987 पे.नं. 125.

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, सयाजीराव गायकवाडांच्या पूर्वीची परिस्थिती शाळेच्या बाबतीत उदासीन दिसून येईल व ग्रामपंचायतीचा पूर्णपणे अभाव होता सयाजीराव गायकवाड यांच्या काळात यात लक्षणीय वाढ झाली आहे. नगरपालिका देखील वाढल्या आहेत. पंचायतराज व्यवस्थेला चालना देणारे प्रशासन म्हणून यांचा उल्लेख महत्त्वाचा आहे.

सयाजीराव गायकवाड हे सामाजिक न्यायाचे आग्रही होते महोत्सव निमित्त निर्माण केलेल्या एक कोटी रुपयांचा विनियोग करताना, मागासवर्गीयाकडे विशेष लक्ष द्यावे असा आदेश महाराजांनी दिला होता. 1882 - 83 ते 1921 - 22 या 40 वर्षाच्या कालावधीत एकूण 13810 हुजूर हुकूम काढले त्यापैकी 10372 हुकूम स्वत: सयाजीरावांनी काढले. उरलेले चिमणाबाई, खाजगी कारभारी, दिवाण

साहेब यांनी काढले होते. यावरुन असे दिसते की ते एक कर्तव्यदक्ष प्रशासक होते. अस्पृश्यता दूर करण्यासाठी त्यांनी राजर्षी शाहू महाराजांप्रमाणे कायदे केले होते. बालविवाह बंदी, विधवा विवाह मान्यता, स्त्रीशिक्षण इ. समाजात क्रांतीकारक बदल घडवून आणणारी कार्य केली होती.

सयाजीराव गायकवाड यांनी राजेशाहीचे लोकशाहीत रूपांतर करण्याचा धाडसी प्रयोग करुन नवभारताच्या जडणघडणीचा पाया रचला. जनतेला मतदानाचा अधिकार, ग्रामपंचायतीची स्थापना सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा, वाचनालयाची स्थापना, अस्पृश्यता, वेठबिगारी, बालविवाह प्रतिबंधक कायदे, राज्यात समृद्धी आणण्यासाठी रस्ते पाणीपुरवठा, जमीन सुधारणा आरोग्य सेवा, उद्योग व्यवसायासाठी कौशल्य शिक्षण, कायद्याचे सामाजिकरण व पारदर्शी प्रशासनासाठी जनमाध्यमाचा प्रभावी वापर अशा अनेक विधायक मार्गानी विधायक राजनिती नमुनादर्श निर्माण केला.

आज भारताला स्वातंत्र्य मिळून 68 वर्षे झाली तरी फुले, शाहु, आंबेडकर यांच्या विचारांची अंमलबजावणी व्हायला हवी होती तशी ती होत नाही. 68 वर्षापूर्वीची जी ग्रामीण भागातील स्त्रीया, भूमिहिनांची परिस्थिती, शेतकरी मोलमजुरी करणारे कष्टकरी आणि दलित समाज यांच्याकडे डोळस नजरेने पाहिल्यास विदारक चित्र समोर येते. ब्रिक्स बँक, युनिसेफ, ॲमेन्स्टी, इंटरनॅशनल तसेच अन्य आंतरराष्ट्रीय संस्थाच्या पाहणीनुसार जगातील 10 % लोक आजही गरीब आहेत. 18 कोटी लोक अतिशय हालाखीचे जीवन जगत आहेत. 30 कोटी मुले - मुली मजुरी, वेश्यावृत्ती व भिक्षावृत्ती यात आपले बालपण घालवत आहेत. दरदिवशी 10,000 मुले अन्नाविना मरण पावतात प्रत्येक मिनिटाला 800 स्त्रिया पुरुषाच्या अत्याचाराची शिकार बनतात. या सर्वाचा विकास घडवून आणण्यासाठी तसेच त्यांना त्यांचे हक्क प्राप्त करुन देण्याची जबाबदारी सामाजिक प्रशासनाची आहे. वरील परिस्थितीत सुधारणा घडवून आणायची असेल तर सामाजिक कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासन प्रारुपाचा आदर्श समोर ठेवून प्रशासकांने राज्यकर्त्यांनी कार्य केली तर समस्या मोठ्या प्रमाणात सुटतील.

संशोधन कालखंड :-

राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासनाचे प्रारूप : एक तुलनात्मक अभ्यास. या विषयासंबंधी संशोधन करताना राजर्षी शाहू महाराजांच्या राज्यभिषेकापासून 2 एप्रिल 1894 ते 6 मे 1922 या अखेरच्या क्षणापर्यंत 28 वर्षे राजर्षी शाहू महाराज कोल्हापूर संस्थानचे राजे होते. तसेच सयाजीराव गायकवाड हे ब्रिटीशांकित 1863 - 1939 बडोदा संस्थानचे राजे होते. या कालखंडाचा अभ्यास करणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांचे त्यांच्या संस्थानातील कार्य प्रशंसनीय आहे. त्यांच्या प्रशासनाच्या माध्यमातून नव भारताच्या जडणघडणीचा पाया रचला आहे. बहुजनांच्या उद्धारासाठी सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य केले ते आजच्या राज्यकर्त्यांना दिशादर्शक आहे. त्यांच्या प्रशासनाच्या माध्यमातून सामाजिक समता व न्याय तत्त्वाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या सत्तेचा वापर सामान्य जनतेसाठी केला. राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांच्या विचारांची कार्याची आणि चळवळीची उपयुक्तता व महत्त्व आजही देशाला व महाराष्ट्राला दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांचे कल्याणकारी निर्णय, वटहुकूम, जाहीरनामे याचा सखोल अभ्यास करावा या हेतूने या विषयाची निवड केली आहे. शासन, प्रशासन, सर्वसामान्य व्यक्ती यांना सामाजिक प्रशासनाची माहिती व्हावी तसेच सध्याच्या सामाजिक प्रशासनाला त्यांच्या प्रशासनाच्या माध्यमातून दिशा मिळावी यादृष्टीने प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती व्यापक स्वरुपाची आहे. कारण राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याची कक्षा व्यापक आहे व या विषयाच्या अनुषंगाने राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या कल्याणकारी धोरणांचा अभ्यास केला जाणार आहे. सामाजिक प्रशासनाच्या प्रारुपाला अनुसरून राज्यातील धोरणे व अधिनियम यापुरता अभ्यास केला जाईल त्यामुळे संशोधन क्षेत्र दोन्ही संस्थानातील कार्यापुरते मर्यादीत आहे.

समस्या सुत्रण :-

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश राजर्षी शाहु महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या काळातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय स्थिती अभ्यासणे, समाजातील दुर्बल, मागासलेल्या व अनादिकाळापासून उपेक्षित राहिलेल्या समाजासाठी व स्त्रीयांसाठी राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या कल्याणकारी कार्याचा आढावा घेणे. राज्यातील जनतेच्या सर्वांगिण विकासासाठी व समाजात समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी अनेक कायदे पारित केले आहेत. त्यात राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांचे प्रशासन यशस्वी झाले आहे काय ? याचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. तळागाळातील लोकांना विकासाची समान संधी प्राप्त झाली का ? राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांनी राज्यातील जनतेच्या हितासाठी कार्य केले असले तरी आजच्या गतिमान युगात त्याच्या

परिणामांचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. यासर्व प्रश्नांची उकल करण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयोगी ठरणार आहे.

संशोधनाचा उद्देश :-

1) राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

2) राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासनाच्या प्रारुपाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

3) राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी बहुजनांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात घडवून आणलेल्या बदलांचा शोध घेणे.

4) राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी पारित केलेल्या विविध कायदे व वटहुकूमांचा तौलनिक अभ्यास करणे.

5) सामाजिक प्रशासनातील समस्यांचा शोध घेणे.

6) राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासनाचे मूल्यमापन करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :-

1) राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक कल्याणाची संकल्पना रुजविली.

2) राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांच्या प्रशासनाचे प्रारुप आदर्श आहे.

3) समाजकल्याणविषयक धोरणामुळे मागासवर्गीयांच्या विकासाला चालना मिळाली.

4) राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक स्वास्थ्य टिकविण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी केले आहे.

5) राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांचे कार्य सद्यस्थितीमध्ये मार्गदर्शक ठरते.

संशोधन क्षेत्राची ओळख :-

प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र राजर्षी शाहू महाराज यांचे करवीर संस्थान कोल्हापूर व सयाजीराव गायकवाड यांचे बडोदा संस्थान, गुजरात या काळातील त्यांनी कलेले शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, कार्य यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती :-

सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीप्रमाणेच या संशोधनासंदर्भात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक

संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्यसंकलन :-

राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासनाचे प्रारुप : एक तुलनात्मक अभ्यास. या विषयासंबंधी संशोधन करीत असताना तथ्ये संकलीत करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोत अशा दोन्हीही प्रकारच्या स्त्रोतांचा आधार घेतला जाणार आहे.

1) प्राथमिक स्त्रोत :-

राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांची मुळ कागदपत्रे.

2) द्वितीयक स्त्रोत :-

i) व्यक्तीगत कागदपत्रे :- आत्मचरित्रे, दैनंदिनी, पत्रे, आठवणी, वैयक्तिक लेख.

ii) सार्वजनिक कागदपत्रे :- शासकीय आणि इतर संस्थाचे अभिलेख, पुस्तके, अहवाल, जनगणना अहवाल, वर्तमानपत्रे, पाक्षिके, मासिक, साप्ताहिक इत्यादींच्या आधारे तथ्यसंकलन केले जाईल.

तथ्यांचे वर्गीकरण व विश्लेषण :-

माहिती संकलन केल्यानंतर मिळालेल्या माहितीचे अध्ययन वर्गीकरण व निष्कर्षन करण्यात येईल. यात प्रामुख्याने खालील पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

1) विश्लेषण पद्धती 2) आलेख पद्धती

प्रकरणांची रचना :-

"राजर्षी शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासनाचे प्रारुप : एक तुलनात्मक अभ्यास." या संशोधन अहवालात खालील प्रकरणांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना - सामाजिक प्रशासन संकल्पना स्वरुप व इतिहास

- विषयाची प्राथमिक माहिती
- संशोधन पद्धती
- भारतातील सामाजिक कल्याण प्रशासनाचा विकास
- सामाजिक कल्याण प्रशासनाची साधने

प्रकरण दुसरे : जीवन परिचय, सामाजिक स्थिती व कार्य

1) राजर्षी शाहू महाराज शिक्षण व प्रवास

- अधिकारप्राप्ती - शैक्षणिक कार्य
- आदर्श राज्यकर्ता म्हणून कार्य, प्रशासक म्हणून कार्य
- सामाजिक संघर्ष, सामाजिक कार्य

2) सयाजीराव गायकवाड शिक्षण व प्रवास

- अधिकार प्राप्ती
- आदर्श राज्यकर्ता म्हणून कार्य
- शैक्षणिक कार्य
- सामाजिक कार्य
- आदर्श प्रशासक म्हणून कार्य

प्रकरण तिसरे : सामाजिक प्रशासनातील समस्या

- राज्यकारभार करताना येणाऱ्या अडचणी
- धोरणांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी
- नियंत्रणाची समस्या
- धोरण व प्रशासनास होणारा विरोध
- समन्वयाचा अभाव

प्रकरण चौथे : राज्यातील धोरणे व अधिनियम

- राजर्षी शाहू महाराजांनी पारित केलेले कायदे
- सयाजीराव गायकवाड यांनी पारित केलेले कायदे, वटहुकूम

प्रकरण पाचवे : शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिणाम

- सामाजिक न्याय प्रस्थापना
- आर्थिक विकासाला चालना
- अस्पृश्यता निर्मुलन
- सामाजिक परिवर्तन - राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांच्या ध्येय धोरणामुळे सामाजिक परिवर्तन घडून आले.

- भारतीय राज्यघटनेतील कल्याणकारी तरतुदी

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात संशोधनातील अंतिम निष्कर्ष नमुद करण्यात येतील. तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्यावरुन निष्कर्ष काढले जाणार आहेत व त्यावरुन राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक प्रशासनाच्या प्रारुपाचे मूल्यमापन करुन सद्यस्थितीतील प्रशासनास मार्गदर्शक उपाय सूचविले जाणार आहेत. तसेच समानतेच्या अधिकाराचे निश्चितीकरण करण्यासाठी उपाय सुचविले जाणार आहेत.

Bibliographical References :

1. O.P. Gautam - Human Rights in India Framework Publication New York, 1982
2. Kirubal, Karan Samuel - Principles of Social Work.
3. P.B. Salunke - Chhatrapati Shahu - The piller of social Democracy (Ed) Kolhapur, 1994.
4. Sangave - Rajarshi Shahu Chahatrapati Papers vol. 5, intro p.45 (Ed), Kolhapur, 1992.
5. Rks - Report on the General Administration of Kolhapur State and its Feudatories, 1892-93.
6. Ranade M.G., Rise of Maratha Power, Publication Dept. Govt. of India.
7. Dr. S.V. Desai - Social life in Maharashtra under the peshwas.
8. K. Ballahatchet - Social Policy and Social change in western india 1957

मराठी संदर्भ ग्रंथाची सूची :-

1. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 2011
2. व्ही.के. चावडा, अनुवाद, स.ग. मालशे, सयाजीराव गायकवाड, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, 1987
3. दाजी नागेश आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे), कर्नाटक प्रिंटिंग प्रेस, 1936
4. बाबा भांड, युगद्रष्टा महाराजा, सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2012
5. डॉ. आर. एस. कोंडेकर, रयतेचा राजा : राजर्षी शाहू महाराज - अरुणा प्रकाशन, लातूर, 2011

6. देवळे श.रा. - राजर्षी शाहू महाराज कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, 1981

7. भोसले एस.एस. (संपा.) क्रांतीसूक्ते : राजर्षी शाहु म.रा.सा.सं.मंडळ, मुंबई, 1991

8. प्रा.लक्ष्मण कोतापल्ले - भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य, विद्याबुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, 2014

9. डॉ. सुधीर बोधनकर, व प्रा. विवेक अलोनी, सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 1999

हिंदी संदर्भ ग्रंथाची सूची :-

1. कऱ्हाडे सदा - धर्म, धर्मनिरपेक्षता और भारत, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद

2. डॉ. एस.एस. भोसले, अनुवादक - प्रा. वेद कुमार वेदालंकार, क्रांती के अग्रदूत - राजर्षी शाहू महाराज, कानपूर

3. तिलक जयंतराव - राजर्षी शाहु गौरव ग्रंथ (संपा.) पी.बी. साळुंके तथा अन्य शिक्षा एवमं सेवायोजना विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई, 1988

4. डॉ. गिरीश मोरे, अनुवादक, डॉ. सविता किर्ते, राजर्षी शाहु विचार और कार्य, निर्मिती संवाद, कोल्हापूर 2013

5. डॉ. सुरेंद्र कटारिया - सामाजिक प्रशासन, R.B.S.A.

6. डॉ. संजयसिंह, संविधान और मानवाधिकार, ओमेगा पब्लिकेशन, नई दिल्ली, 2010

मासिक व साप्ताहिक :-

1. The Indian Journal of Political Science

2. The Indian Journal of Public Administration

3. Economics and Politcal Weekly

4. Maharashtra at a Glance

5. योजना

6. परिवर्तनाचा वाटसरू

7. शोध संपदा

8. प्रतिष्ठान

9. समाजप्रबोधन पत्रिका

10. प्रबोधन प्रकाश ज्योती

11. लोकराज्य

12. साधना

मार्गदर्शक

डॉ. टी. एन. मगर

विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग

श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला

महाविद्यालय, लातूर

संशोधक

कसबे शिवशंकर दगडू